# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक २५६९६०६१
२५६९००६२,
२५६९६०६४
२५६९००६५

गणेशखिंड, पुणे ४११००७

टेलिग्राम 'युनिपुना'
टेलेक्स: १४५७७१९ युनिप इन्
फॅक्स : ०२०– २५६०११५४

संदर्भ क्र. : विकमं/२०१०/४२७ दिनांक : ०५/१०/२०१०.

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था

**विषय :– विद्यापीठस्तरीय विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी (UR) कार्यशाळा....**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ कलम ४० (३) अन्वये निवड झालेल्या संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्यापीठ प्रतिनीधींची (U.R.) कार्यशाळा दरवर्षी पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ आयोजित करत असते. या ही वर्षी पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व शिरुर शिक्षण प्रसारक मंडळाचे, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरुर घोडनदी, जि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १० व ११ ऑक्टोबर, २०१० रोजी चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरुर घोडनदी, जि. पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेमध्ये विद्यार्थी प्रतिनिधींना विद्यार्थी कल्याण मंडळाच्या विविध योजनांमागील विद्यापीठाची भूमिका, क्रीडा, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, समर्थ भारत अभियान, माहिती अधिकार कायदा, इत्यादी उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग या विषयी माहिती देण्यात येणार आहे. मा. कुलगुरु, मा. कुलसचिव व विद्यापीठातील सर्व अधिकारी या कार्यशाळेस उपस्थित राहून प्रतिनिधींशी सुसंवाद साधणार आहेत. आपल्या महाविद्यालयातील विद्यापीठ प्रतिनिधीस (U.R.) सदर कार्यशाळेस अवश्य पाठवावे. विद्यार्थी प्रतिनिधीचा प्रवास खर्च विद्यापीठाकडून अदा करण्यात येईल. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधीस या कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत अवश्य सूचित करावे, ही विनंती.

कळावे,

**संपर्कासाठी दूरध्वनी : कार्यालय – ०२१३८–२२२३०१/२२४१७०**
**प्रा. हरिदास जाधव : मोबाईल : ९८९०४३९८३२, ९७६७१०१८२२**

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ